भारती हॉस्पिटलचा सामाजिक उपक्रम

# आरोग्य भारती

फेब्रुवारी मार्च -२०१८ अंक- एकोणीस




## भारती परिवार पोरका झाला.

काम झालं पाहिजी...
अडचण असल तर माझ्याकड ये...
विद्यापीठाचा मी सगळ्यात मोठा डॉक्टर आहे...

हे शब्द कायमचे थांबले

शोकाकुल
भारती विद्यापीठ मेडिकल फौंडेशन
भारती हॉस्पिटल परिवार, पुणे
आरोग्य भारती
भारती न्युज ब्रॉडकास्टिंग सर्व्हिस



साहेब...आमच्यासाठी प्रत्येक कठीण प्रसंगी खंबीरपणे पाठीशी उभे राहणारे, संस्थेतील सर्वात जाणते व प्रत्येक विषय समजून माझ्या शब्दावर विश्वास दाखवून हॉस्पिटल बाबतच्या विषयांना त्वरीत मंजूरी देणारे आमचे सर्वांचे मार्गदर्शक होते. साहेब आपल्यात नाहीत ही भावना मोठी दु:खदायक आहे. प्रत्येक व्यक्तिला उपचार मिळाले पाहिजेत आणि तेही कमी खर्चात व अत्याधुनिक साधनांचा वापर करून याबबतचा साहेबांचा सतत असलेला आग्रह, ‘डॉक्टर प्रत्येक गोष्ट टॉपची झाली पाहिजे’ हे त्यांचे शब्द या सर्वांना आज मी व माझे सहकारी मुकलेलो आहोत. संवादकौशल्य व त्यातून लोकांमध्ये निर्माण केलेला विश्वास ही अतिशय महत्वाची गोष्ट डॉक्टरांनी साहेबांकडून घेणे महत्वाचे आहे. आभाळाएवढ्या कोसळलेल्या दु:खातून सावरण्याची शक्ति परमेश्वर कुटूंबियांना देवो ही प्रार्थना !

डॉ.संजय ललवाणी,
मेडिकल डायरेक्टर,भारती हॉस्पिटल

साहेब साहेब होते. मोठ्या मनाचे दिलदार व्यक्तिमत्व. हॉस्पिटलमुळे अनेकदा साहेबांशी भेटण्याचा बोलण्याचा योग येई. संस्थेचा लाभधारक म्हणून नाहीतर साहेबांचा एक कार्यकर्ता म्हणून मला अधिक जवळीक होती. लहानपणा-पासून साहेबांना पाहत आलो आहे. त्यांच्या कामाची हातोटी व गावात आल्यावर सामान्यजणांशी असलेली नाळ यातून मला प्रेरणा मिळत गेली आहे. साहेब आपल्यात नाहीत ही भावनाच सहन होत नाही. मा.बाळासाहेब, मा.ताईसाहेब यांना दु:खातून सावरण्याची ताकद ईश्वर देवो एवढीच प्रार्थना.

प्रवीण जाधव, भारती हॉस्पिटल

आपले साहेब सर्वांना आपले वाटणारे, सर्वांच्या मनावर राज्य करणारे आणि शेवटी सर्वांच्या मनाला चटका लावून गेलेले. साहेब आपल्यामुळेच हजारो हातांना रोजगार मिळाला कित्ये-कांना आधार मिळाला. साहेब प्रत्येकाला आपले वाटत याची प्रचिती ज्यावेळी मी ‘आपले साहेब’ ही कल्पना ठेऊन केलेल्या क़ॅम्पेनला भरभरून मिळालेल्या प्रतिसादावरून दिसून आली.आपल्याशिवाय आठवा मजला ही कल्पनादेखील असह्य होत आहे. साहेब परत या.....

चंद्रशेखर वाघ, भारती हॉस्पिटल, भारती न्युज ब्रॉडकास्टिंग





काही व्यक्तिंच्या नावासमोर कधीच स्वर्गीय लावण्याची वेळ येऊ नये अशी इच्छा असते, आदरणीय पतंगराव कदम साहेब अशा काही मोजक्या व्यक्तिंपैकी होते. कदम साहेबांचं मला आवडलेले वैशिष्ठय म्हणजे त्यांचा कायम हसतमुख चेहरा व त्यांचा आपुलकीचा स्वभाव. त्यांच्या चेहऱ्यावर असलेले स्मितहास्य त्यांच्या इच्छाशक्तिची आणि त्यांच्या साध्या सरळ स्वभावाची एक झलक होती.

सगळे जग साहेबांना शिक्षणमहर्षी किंवा राजकारणी म्हणून ओळखत असल तरी माझ्या कुटुंबाचे व त्यांच्या कुटुंबाचे स्नेहाचे संबंध आहेत. म्हणून मी साहेबांना एका वडीलधाऱ्या व्यक्तिच्या स्वरुपात बघितले. आपल्या मनात व्देष, तिरस्कार, मत्सर काहीही न ठेवता सगळयांसाठी आशिर्वाद ठेवणारे साहेब आज आपल्यात नाहीत ही आपल्या सर्वांची फार मोठी हानी आहे. राजकारणातून स्वत:च अढळ स्थान निर्माण करणारे साहेब आज नाहीत हे महाराष्ट्राच्या राजकारणाचं नुकसान आहेच पण मी व माझ्या कुटुंबाने आज एक मायेचा आधारवड गमावला आहे.

साहेबांच्या आत्म्याला ईश्वर शांती देवो व त्यांच्या परिवाराला या दुखा:तून सावरण्याची शक्ति देवो.

अभिषेक बोके, सिनेट सदस्य, सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठ

गोरगरीबांचा आधार गेला,
आज सोनहिरा पोरका झाला
महाराष्ट्रभर एस.टी.धावली,
गोरगरीबांची होती सावली
साहेब का केली तुम्ही घाई,
सामान्यांची होता तुम्ही आई.

वादळात दिवा लावणारा
परिस्थितीला खंबीरपणे
तोंड देणारा
स्वयंभु नेता, स्पष्ट वक्ता
आमचा भारती परिवाराचा
तारणहार गेला

फेसबुक वॉलवरून साभार



# भारती विद्यापीठाचा आधारवड – प्रा.मिलिंदजोशी, कार्याध्यक्ष महाराष्ट्र साहित्य परिषद,पुणे

भारती विद्यापीठाचे संस्थापक डॉ. पतंगराव कदम यांच्या निधनाची वार्ता येऊन धडकली आणि काळजाला चटका बसला! महाराष्ट्रातील शैक्षणिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात उत्तुंग कामगिरी करणारे एक लोकोत्तर नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले. लाखांचा पोशिंदा आणि वडिलधारा माणूस गेला. भारती विद्यापीठ परिवारात सर्वजण त्यांना 'साहेब' म्हणत. ग्रामीण भागातील माणसांना समृद्धीचा प्रकाश दाखवायचा असेल तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही, हे त्यांनी वेळीच जाणले होते. प्रचंड जिद्द, महत्त्वाकांक्षा, भव्य स्वप्ने पाहण्याची आणि साकार करण्याची अंगी असलेली धमक, सकारात्मक वृत्ती, चांगली माणसे शोधून, त्यांना गुणदोषांसह स्वीकारून त्यांकडून उत्तम काम करून घेण्याची हातोटी या बळावर हे विद्यापीठ विश्वविद्यालयात रूपांतरित झाले. भान ठेवून योजना आखा आणि बेभान होऊन त्या राबवा, हा मंत्र साहेबांनी केवळ त्यांच्या सहकाऱ्यांनाच दिला असे नाही, तर तो वैयक्तिक जीवनातही आचरणात आणला. त्यांचे संपूर्ण जीवन म्हणजे एक ज्ञानपर्व होते. झपाटलेपण त्यांच्या रक्तातून वाहत होते.

मानव ही जात, मानवता हा धर्म आणि गतिमान शिक्षणातून समाज परिवर्तन हे ब्रीद घेऊन शिक्षण क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या कदमसाहेबांनी ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या सहकार क्षेत्रातही नेत्रदीपक कामगिरी केली. जे निर्माण करायचे ते उत्तम करायचे ही त्यांची वृत्तीच होती. त्यामुळे त्यांनी जे जे निर्माण केले ते ते पाहताना साहेब आधुनिक युगातला विश्वकर्माच आहेत, असे लोकांना वाटायचे. भारती विद्यापीठ परिवारासाठी ते आधारवड होते. ते नेहमी म्हणत, भारती विद्यापीठातील १० हजार सेवक म्हणजे १० हजार मेंदू आणि २० हजार हात एवढी बौद्धिक संपत्ती माझ्याकडे आहे. त्या बळावर मी अशक्य ते शक्य करून दाखवीन.

राजकारणात, समाजकारणात वावरताना त्यांच्या उमद्या स्वभावाचे सहजतेने दर्शन घडत असे. त्यांचे रांगडे उत्स्फूर्त भाषण ऐकताना त्यांच्या सरळ साध्या पारदर्शक व्यक्तिमत्त्वाचे दर्शन लोकांना घडायचे आणि या माणसाला आंतरबाह्य इथल्या माती-माणसाने आणि संस्कृतीने घडविले आहे, याची साक्ष पटायची! त्यांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे, अडचणीत असणाऱ्या माणसांचे दुःख त्यांना पाहवयाचे नाही. तत्परतेने मदत करण्यासाठी ते उत्सुक असायचे. या हाताने केलेली मदत त्या हाताला कळू द्यायचे नाहीत.त्यांनी केवळ संस्था उभ्या केल्या नाही तर माणसं उभी केली. त्यांचे संसार सावरले. त्यामुळे आपल्या कुटुंबातला, पाठीशी उभे राहणारा, वडिलधारा माणूस आहे, अशी जनसामान्यांची भावना असायची. सत्ता आणि पद मिळाले; पण त्यांच्यामधल्या साधेपणाला थोडीही बाधा आली नाही. साध्या, रांगड्या, उमद्या व्यक्तिमत्त्वामुळे त्यांचे कर्तृत्व झळाळून निघायचे. आर्थिक ऐपत नसल्यामुळे शुल्क माफी मागणीसाठी आलेल्या गरजू विद्यार्थ्यांच्या अर्जावर सही करून त्याचे नाव, गाव, जात-पात, धर्म न पाहता ते मदत करायचे. गरजू कलावंतांना, लेखकांना ते भारती विद्यापीठातर्फे दरमहा पेन्शन देत असत. जनसामान्याशी इतके एकरूप झालेले लोकनेतृत्व आजच्या काळात पाहायला मिळणे कठीण आहे.

त्यांच्या निधनाने एक मोठे पर्व संपले आहे. माणूस पराक्रमी असला तरी नियती क्रूर असते, हे मान्य केल्यावाचून पर्याय उरत नाही. समाजहिताला सदैव प्राधान्य देणाऱ्या, जनसामान्यांच्या सुख दुः खाशी एकरूप होणाऱ्या स्वयंभू नेतृत्वाला विनम्र आदरांजली.

आमचा देव हरपला, जनसामान्यांना आधार देणारा सुर्य मावळला साहेब सांगा कुठे शोधु तुम्हाला.....

ज्यांच्यामुळे माळरानांना बहार आला,कोरडवाहू शेती बागायत झाली,अनेकांच्या हाताला रोजगार देऊन अनेकांच्या जीवनाला भरारी देऊन समाजाचा सर्वांगिण विकास साधणारे एक दमदार नेतृत्व....

ज्या भागाला घाटमाथा आणि दुष्काळी म्हणून संबोधले जायचं, जिथे पावासाळ्या शिवाय हिरवळ बघणं दुर्मिळ तोच भाग साहेबांनी आपल्या इच्छाशक्तिच्या जोरावर सुजलाम सुफलाम केला.याच घाटमाथ्याची घाटापेक्षा चांगली प्रगती होताना दिसत आहे, ती केवळ साहेबांमुळेच. भागाचा आणि सर्वसामान्य जनतेचा विकास यासाठी साहेबांनी आपली तत्वं,निष्ठा सातत्याने जपली, केवळ सांगली जिल्ह्या पुरतंच नाही तर महाराष्ट्रातील विविध ठिकाणच्या सर्वसामान्य जनतेला साहेबांनी आधार दिला.

साहेबांच्या वाट्याला नेहमीच संघर्ष आला, पण साहेब कधी डगमगले नाहीत. आपलं राजकीय अस्तित्व टिकवण्यासाठी अनेकांनी आपली तत्वं बदलली तर निवडून येण्यासाठी पक्ष बदलले, अनेक वेळा योग्यता असून सुध्दा साहेबांचा योग्य सन्मान झाला नसला तरी आपली विचारधारा, पक्षहित आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी साहेबांनी नेहमीच आपली तत्व जपून आदर्श आणि सुसंस्कृत राजकारण केलं. एसटी महामंडळाच्या सदस्य पदापासून ते महाराष्ट्र राज्याच्या विविध खात्यांच्या कॅबिनेट मंत्रीपदापर्यंत मिळालेल्या प्रत्येक खात्याला साहेबांनी आपल्या कारकीर्दीत चांगला दर्जा प्राप्त करून दिला.

सर्वसामान्य जनतेने अनेकदा साहेब मुख्यमंत्री असण्याचं स्वप्न पाहिलं आणि आजही साहेब मुख्यमंत्री होण्याची सामान्य जनतेला आशा होती, ती केवळ त्यांच्या जनमानसातील आपुलकी आणि कर्तृत्वामुळेच.

आपल्या इच्छाशक्तिच्या जोरावर खडतर परिस्थितीवर मात करून शिक्षण, सहकार, ग्रामीण विकास, उद्योग अशा विविध क्षेत्रात सकारात्मक बदल घडवून जनसामान्यांचा विकास करणारे तसेच खडतर काळात आपल्या पक्षासोबत राहून प्रामाणिकपणे राष्ट्रीय काँग्रेसची चळवळ जिवंत ठेवण्यामध्ये तसेच महाराष्ट्राच्या विकासात मोलाचं योगदान देवून समाजहिताचे भरीव कार्य करणाऱ्या आदर्श व्यक्तिमत्वच्या मा. साहेबांना साश्रू नयनांनी भावपूर्ण श्रध्दांजली.

कपिल दिनकर पाटील
सातारा जिल्हा युवक काँग्रेस

# आठवणी




भारती हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर

पुणे-सातारा रोड,धनकवडी,पुणे-४३

+91 20 40555555/40555444 admin@bharatihospital.com /bharatihospitalpune



Disclaimer - This issue is for Private Circulation Only. Not for sale. The contents of this issue are for information purposes only. Always take advice of a qualified physician for any doubts. Free image used from web under CCO license.